व्यंकटेश महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन संपन्न

मिसाईल मॅन म्हणून ओळख असलेले भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन श्री व्यंकटेश महाविद्यालयात करण्यात आले होते. आयुष्यात पुस्तके वाचल्याने व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत होते, ज्ञान आर्जित करणे हे विद्यार्थ्यांचे परम कर्तव्य असते त्यासाठी विद्यार्थ्यांनी थोर व्यक्तींची, महापुरुषांची जीवनचरित्र, त्यांचे जीवन कार्य आणि आदर्श त्यांचा जीवन प्रवास जाणून घेण्यासाठी पुस्तके हेच एक माध्यम आहे त्याद्वारे आपण मौलिक विचार, ज्ञान अर्जित करू शकतो असे मत आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर विजय माने यांनी केले व्यक्त केले. वाचनाने माणूस समृद्ध बनतो, प्रगल्भ विचार, तर्कशुद्ध विचार, विवेक बुद्धी अशा अनेक गुणांमध्ये वाढ होण्यास वाचन मदत करते. वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना  उमजावे या उद्देशाने आजचा हा वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो असे मत सहयोगी प्राध्यापिका डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी व्यक्त केले, त्यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अगदी गरीब परिस्थितीतून देखील शास्त्रज्ञ, प्राध्यापक, मिसाईल मॅन, राष्ट्रपती असे अनेक पदे भूषविण्यामध्ये कलाम यांना त्यांच्या जवळ असलेला ज्ञानसाठा खूप मोलाचा ठरला आणि हे ज्ञान त्यांनी वाचनांमधून प्राप्त केले त्यामुळे पुस्तके व्यक्तीचे आयुष्य घडविण्याचे काम करतात. विद्यार्थ्यांनी देखील मनोगते व्यक्त केली.

